४ ललित
प्लॉट नं. ७, स. न. १३१/१+२
औंध, पुणे ४११००७

मा. संपादक
'साहित्य सूची'

यांस स. स. वि. वि.

'साहित्य सूची'तील ऑगस्ट ८९ च्या अंकातील विश्वेश्वर सावदेकर यांच्या लेखासंदर्भात काही मुद्दे मांडावेसे वाटतात.

(१) वैयक्तिक पातळीवरील टीका सावदेकरांना निम्न अभिरुचीची वाटते. परंतु जेव्हा एखादी व्यक्ती बेजबाबदार विधाने करून डॉक्टरेट मिळवते तेव्हा त्या विधानांवर केलेली टीका सहन करण्याची पाळी त्या व्यक्तीवर येणे साहजिकच आहे. सावदेकरांनी केलेल्या चुकीच्या विधानांचे माप मी त्यांच्या पदरात टाकले हे त्यांच्या 'सदभिरुची'ला मानवलेले दिसत नाही.

(२) खाजगी पत्राचा उल्लेख सावदेकरांना आवडला नाही ते ही साहजिकच आहे. आपण प्रसिद्ध केलेल्या निबंधा–प्रबंधात एक लिहितो आणि खाजगी पत्रात उलटे हे जगजाहीर झालेले कोणाला आवडेल ?

(३) माझ्या लेखात दिलेले आव्हान सावदेकरांना पेलले नसावे. मी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देणे किंवा माझ्या विधानांचे खंडन करणे (मला पंतोजी ठरवून) त्यांनी कटाक्षानी टाळले आहे. याचे कारण...जर त्यांनी 'आइस' आणि 'ऑक्टोबर द फर्स्ट इज टू लेट' ही पुस्तके वाचली असतील तर त्यांना आपल्या विधानांचा फोलपणा जाणवला असता; आणि नसतील तर संदर्भ न वाचता विधाने करण्याची बेजबाबदारी त्यांना मान्य करावी लागली असती. तेव्हा माझ्या प्रश्नांचे 'होकारात्मक' वा 'नकारात्मक' कुठलेही उत्तर त्यांना परवडणारे नाही ही वस्तुस्थिती आहे.

(४) मी सावदेकरांचा शोधनिबंध वाचलेला नाही पण मी असे समजतो की त्यांनी आपल्या विविध लेखात जी विधाने केली आहेत ती त्यांच्या शोधनिबंधावर आधारलेली आहेत. म्हणून त्या लेखातील विधानांचा पोकळपणा दाखवला की शोधनिबंधाचा पोकळपणा आपोआप सिद्ध होतो. वैज्ञानिक शोधनिबंधातील मुद्दे सिद्ध करायची जबाबदारी लेखकावर असते. साहित्यिक क्षेत्रात देखील ही शिस्त पाळली जाते असे मला वाटते... पण त्याला अपवादही असतात हे सावदेकरांच्या उदाहरणावरून दिसते.

(५) उदाहरणार्थ 'सेवन स्टेप्स टू द सन' आणि 'गंगाधरपंतांचे पानिपत' ह्या कथांत सावदेकरांना जे साम्य सापडले ते केवळ फूटपाथवरील ॲक्सिडेंटमध्ये! सेवन स्टेप्समध्ये मनुष्य अनेक धक्क्यात पुढच्या काळात जातो तर गंगाधरपंत त्याच काळातील एका समांतर विश्वात जाऊन येतात. हा वैज्ञानिक कल्पनांमधला उघड उघड फरक सावदेकरांच्या लक्षात येत नाही यावरून पुष्कळ बोध घेण्यासारखे आहे. 'ए फॉर ॲंड्रोमिडा' आणि 'अखेरचा पर्याय'मध्ये त्यांना नेमके काय साम्य सापडले हे मी त्यांना विचारीत नाही ...उगाच पंतोजीचा शिक्का पुन्हा कशाला मिळवा ?

(६) कॉनन डॉयलच्या शेरलॉकहोम्सच्या गोष्टींमध्ये 'ओपेल टियारा' ही गोष्ट नाही. ती कथा कोणी केव्हा आणि कुठे लिहिली हे सावदेकरांनी सांगावे. कदाचित् हा त्यांचा एक नवा शोधही असेल.

(७) मला काय सांगायचे होते ते माझ्या साहित्यसूचीतील लेखात सांगितले आहे. माझ्या अनेक पुस्तकांवर टीकात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत...स्तुतीपर आणखी चुका दाखवणारे. मी साहित्यिक नाही... साहित्यातील त्रुटी कोणी दाखवल्या तर मी त्या मान्य करतो. म्हणून प्रत्येक टीकेला उत्तर देण्याच्या भरीस पडत नाही. परंतु बेजबाबदार विधानांवर केलेला वाङ्मयचौर्याचा आरोप मी कदापि सहन करणार नाही...म्हणून सावदेकरांच्या टीकेला उत्तर दिले. या उपर त्यांच्या विधानांना खोडून काढण्यात माझा वेळ खर्च करू इच्छित नाही– ते 'सूर्य पश्चिमेस उगवतो' असे म्हणाले तरी. तो वेळ नवी स्वतंत्र विज्ञान कथा लिहिण्यास सत्कारणी लागेल.

जयंत नारळीकर